# ‘‘समर्थ रामदास आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व साहित्याचा तौलनात्मक अभ्यास’’

प्रस्तावना :

मराठी वाङ्ःमयाच्या अभ्यासात आता ‘तुलनात्मक अभ्यास पद्धती’ चांगलीच रूजू पहात आहे. यामध्ये आजवर प्रामुख्याने भिन्न भाषिक, भिन्न प्रादेशिक साहित्यिकांच्या साहित्याचा अभ्यास झाला आहे. परंतु एकच भाषिक साहित्याचा तुलनात्मक विचार फार कमी प्रमाणात झालेला आढळतो. प्रस्तुत विषयाद्वारे एकाच भाषेतील, एकाच प्रदेशातील परंतु भिन्नकालीन साहित्यिकांच्या व्यक्तिमत्वाचा व साहित्याचा अभ्यास करण्याचे योजिले आहे.

रामदासांचा आणि सावरकरांचा आजवर विपुल प्रमाणात विविधांगी अभ्यास झाला आहे. त्यांच्या अनुषंगाने बरेच वादविवादही झाले आहेत.परंतु प्रस्तुत अभ्यासक त्यांच्या अनेक साम्य-भेददर्शक अंगाची तुलना करत करत त्यांच्या विचारांची वर्तमानकालीन समस्यांच्या, प्रश्नाच्या उपयोजनाच्या दृष्टीने चर्चा करणार आहे.

प्रस्तुत अभ्यासकाने निवडलेली एकभाषिक, एकसांस्कृतिक साहित्यिकांच्या तुलनात्मक अभ्यासाची पद्‌धती मराठीत फारशी उपयोजिली गेलेली नाही.कोणतीही पद्‌धती ही तिच्यातून प्राप्त होणा-या मर्मदृष्टीसाठी वापरायची असते. आपल्या वाङ्ःमयाचा ज्यामुळे अधिक चांगला उलगडा होईल त्या सर्व तुलना आपण केल्या पाहिजेत. मग त्या पाश्चात्य परंपरेत विकसित झालेल्या तौलनिक साहित्याच्या एखाद्‌या रूपाशी जुळोत किंवा न जुळोत.भारतीय साहित्याचे स्वरूप लक्षात घेउन आपल्या विशिष्ट गरजाच्या संदर्भातच आपला तुलनात्मक अभ्यास विकसित व्हावयास पाहिजे असे वसंत बापटांना वाटते. रामदासी साहित्याचा तौलनिक दृष्टीने काही अंशी विचार झाला आहे पण एकभाषिकांच्या परिप्रेक्षात सावरकरांबरोबरची त्यांची तुलना नव्याने होत आहे. ती प्रस्तुत अभ्यासक करू इच्छितो.

प्रस्तुत अभ्यासकाने समर्थांचे आणि सावरकरांचे साहित्य वाचले तेव्हा लक्षात आले की, ह्या दोघांच्या विचार प्रकृतीचा,लेखनवैशिष्ट्‌यांचा व त्यांच्या वर्ण्यविषयाचा तुलनात्मक विचार होणे गरजेचे आहे.त्यासाठी ‘तुलनात्मक अभ्यास पद्धती’ हीच उपयुक्त आहे;. म्हणून ह्या पद्धतीचा स्वीकार करून ‘‘ समर्थ रामदास आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या वाङ्ःमयीन प्रेरणा, भूमिका, वैचारिक जाणिवा आणि व्यक्तिमत्व यांचा तुलनात्मक अभ्यास ’’ हा विषय संशोधनासाठी घेत आहे.

## भूमिका व कालिक प्रेरणा

आज देश विलक्षण गंभीर परिस्थितीत असून जाती - धर्माच्या अंध विचारामुळे स्फोटक वातावरण निर्माण झाले आहे.अनेक समस्यांनी स्वदेश ग्रासला जात आहे; त्यामुळे भारतवर्षाच्या एकात्मतेला, अखंडतेला व स्वत्वाला धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रीय विचाराने भारलेल्या स्वराज्यप्रेमी संत रामदास आणि जाज्वल्य देशभक्तीचा मूर्तिमंत आविष्कार असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या स्वदेशनिष्ठ विचारांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.तसेच रामदासांच्या अध्यात्मनिष्ठेची व वैराग्यवृत्तीची आजच्या सुखलोलुप आणि अशांत समाजाला गरज आहे.तसेच जगात भारताला महासत्ता बनून स्वयंपूर्णतेने जगण्यासाठी सावरकरांच्या विज्ञाननिष्ठेची व जाज्वल्य देशाभिमानाची नितांत गरज आहे हे प्रस्तुत अभ्यासक या तुलनेद्‌वारे सांगू इच्छितो.

आज जागतिकीकरणाच्या लाटेत व मराठी व्यतिरिक्त इतर भाषांच्या प्रभावापुढे खुद्द मराठी भाषेच्या स्वत्वाचा,अस्मितेचा तसेच अस्तित्वाचा व सार्वत्रिक वाढीचा यक्षप्रश्न आपल्यापुढे मूळ धरतो आहे.तेव्हा ज्या रामदासांनी देशी भाषेचा नेटाने स्वीकार केला ; अभिमान बाळगला त्यांच्या विचारांचे आज स्मरण व चिंतन होणे आवश्यक आहे. त्याच बरोबर सावरकरांच्या मराठी भाषाशुदधीचा, देवनागरी लिपीसुधारणेचा आजच्या संगणकीय मराठीच्या दृष्टीने नव्याने विचार झाला पाहिजे असे अभ्यासकास वाटते.

समर्थ रामदास आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या व्यक्तिमत्वात व साहित्यात अनेक साम्य भेददर्शक गोष्टी आहेत. आजवर समर्थांचा आणि सावरकरांचा स्वतंत्र अभ्यास झालेला आहे. किंबहुना समर्थांचा संत म्हणून इतर संता बरोबर व सावरकरांचा राष्ट्रीय विचाराचे लेखक, कवी म्हणून इतर लेखकांबरोबर तुलनात्मक विचार झालाही असेल; परंतु ह्र्या भिन्न परंपरेतील प्रतिभावंताचा तुलनात्मक विचार झालेला नाही. तो होणे गरजेचे आहे. ह्र्या दोन्ही प्रतिभावंताच्या परंपरेत दोघेही स्वतंत्र स्थान पावलेले आणि तुल्यबळ एकके आहेत त्यामुळे ह्र्या प्रस्तुत तुलनेत लक्षणीय व फलदायी निष्कर्ष अपेक्षित आहेत. डॉ.र.बा. मंचरकर यांच्या मते –‘‘बहुभाषिक, बहुसांस्कृतिक साहित्याची तुलना सुप्रतिष्ठीत झाली म्हणून एकभाषिक, एकसांस्कृतिक साहित्याची अंतर्गत तुलना सोडून द्यावी असे नाही. साहित्याचा अभ्यास करताना विविध प्रकारच्या तुलनांची गरज केव्हाच संपत नाही. ’’(तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्‌मय –डॉ.र.बा.मंचरकर, पृष्ट क्रः३४ )

तसेच प्रस्तूत अभ्यास विषयाच्या कालिक प्रेरणांचा पुढील पद्धतीने विचार करण्यात येणार आहे; ०१.तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा ह्र्या लेखकांवर पडलेला प्रभाव ०२.त्या कालखंडातील साहित्याचा ह्र्या लेखकांवर पडलेला प्रभाव ०३.तत्कालीन व्यक्तिंचा जनमानसावरील प्रभाव लेखकांना प्रेरीत करतो काय? ह्र्याचाही येथे अभ्यास अपेक्षित आहे.

## व्यक्तिमत्त्वाचा तुलनात्मक विचार

समर्थ रामदास आणि स्वातंत्र्यवीर सावरकर हे स्वयंभू व्यक्तिमत्त्व आहेत तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ब-याच तुलनीय साम्य-भेद दर्शक गोष्टी आहेत त्यांचा येथे एकत्रीत विचार होणे गरजेचे आहे.

समर्थ रामदास आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या नावाचा जरी प्रथमदर्शनी विचार केला तरी लक्षात येते की, एक ‘समर्थ’ आहे; तर दुसरा ‘वीर’आहे. ह्या संबोधनातून त्यांच्या निर्भीड,बंडखोर आणि जहाल व्यक्तितत्त्वाचे सूचन होत आहे.

समर्थांनी आपले जीवित कार्य नाशिक जिल्हयातील टाकळी या गावापासून सुरू केले तर सावरकरांनी आपले कार्य नाशिक जिल्हयातील भगूर या जन्मगावापासून सुरू केले.

म्हणजेच दोघांचीही प्रादेशिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी ही समान होती.ह्यांच्या परस्परांच्या जीवनातील कितीतरी घटनांमध्ये विलक्षण साधर्म्य आहे तर काही मोजक्या गोष्टीत वैधर्म्यही असल्याचे दिसते.

समर्थांच्या व सावरकरांच्या चरित्राचा विचार करता त्यांच्या आयुष्यातल्या घटनांक्रमातही ब-याच साम्यदर्शक बाबी आढळून येतात.दोघांच्या वृत्तीमध्ये वैराग्य आणि वैराग्यच भरलेले होते. निस्पृहता अन् ह्या वैराग्याचं प्रतीक असलला भगवा झेंडा रामदासांनी शिवरायाच्या स्वराज्यासाठी सुचविला होता तर तसाच कृपाण-कुंडलिनी चित्रित भगवा झेंडा सावरकरांनी 'स्वतंत्र' भारतासाठी सुचविला होता.

लेखनाद्वारे आपल्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्यावर त्यांचा भर होता. जाज्ज्वल्य राष्ट्रप्रेम आणि ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे समर्थांचे व सावरकरांचे लेखन त्यांच्या चरित्राशी निगडीत, आत्मनिष्ठ आहे.आणि ते आपल्या वेगळ्या शैलीची मोहर मराठी वाङ्‌मयावर उमटवून गेले आहे.

रामदासांनी संसाराच्या मायाजाळात लग्नाची बेडी पत्करलीच नाही.देवतुल्य आईचा विरह सोसला. सगे-सोयरे, बंधु, मित्र त्यागून 'दास डोंगरी राहतो, चिंता विश्वाची करतो' असे ते राहिले तर सावरकरांनी आपली माता पत्नी, मुलगा, बंधु, वहिनी,घर-दार सर्वच्या सर्व गोष्टीवर पाणी सोडले अन् स्वातंत्र्याचा यज्ञकुंड धगधगता ठेवला. रामदास आणि सावरकर दोघांनाही संसाराप्रती विशेष मोह दिसत नाही अन् तिरस्कारही दिसत नाही. संसार-प्रपंच या विषयावर त्यांनी आपले मत साहित्याद्वारे नोंदविले आहे.

लोक रामदासांना 'समर्थ' संबोधित असले तरी त्यांनी स्वतःला रामाचा 'दास' म्हणविले आहे. तसेच सावरकरांना लोक 'स्वातंत्र्यवीर' संबोधित असले तरी ते स्वतःला मात्र 'महाराष्ट्र भाट' समजतात. यातून त्यांची भावभक्ती अन् लेखननिष्ठाच प्रकट होत आहेत असे वाटते.

सावरकरांच्या एकूण विचारसरणीचा, लेखननिष्ठांचा विचार करता सावरकरांवर रामदासांच्या विचाराचा स्पष्ट प्रभाव जाणवतो. सावरकरी साहित्यात पदोपदी आढळणा-या रामदासी वचनांवरून वाटते की, सावरकरांनी संपूर्ण रामदास स्वामी अभ्यासले असावेत. सावरकरांनी आपल्या लेखनात विपुल ठिकाणी रामदासांचे अनुयायित्व, प्रभाव आणि महत्त्व मान्य केले आहे. प्रसंगी विरोधही नोंदवला आहे.

आपल्या विवेचनास पुष्टी देताना सावरकर रामदासांचे स्मरण करतात.ज्या जोसेफ मॅझिनीला ते आपले प्रेरणादायी दैवत मानतात तो मॅझिनी त्यांना रामदासांचेच प्रतिरूप वाटतो. ते म्हणतात, 'सत्पुरूष हे परमेश्वराच्या अंशाने संभूत झालेले असल्याने त्यांचे

आत्मे हे भिन्न नसतात व म्हणूनच त्यांचे विचारही परस्परांशी विसंगत होत नाहीत. निरनिराळ्या देशातील त्यांची नावे तेवढी वेगळी बाकी तत्व एकच. इटलीमध्ये जन्मलेल्या रामदासांना मॅझिनी म्हणतात व हिंदुस्थानात जन्मलेल्या मॅझिनाला रामदास म्हणतात. बाकी दोघेही एकच तत्त्व सांगतात आणि ते हे की, राजकारण धार्मिक असेल तरच ते पवित्र आहे व धर्म राजकीय असेल तरच तो पवित्र आहे. (जोसेफ मॅझिनी --वि.दा.सावरकर पृष्ट क्र : २६ एकंदरीत रामदास व सावरकरांचे व्यक्तिमत्व तुळून पाहिल्यास त्यात कमालीच्या सारखेपणा व वेगळेपणाच्या गोष्टी आढळतात.साधारणतः खालील मुद्दयाच्या अनुषंगाने त्यांचे व्यक्तिमत्व तुळून पाहता येईल. खालील विषयासंबंधी दोघांनीही काही एक भूमिका मांडली आहे.

## मराठी भाषा व लेखनविषयक विचार

समर्थांनी व सावरकरांनी प्रतिभावंताच्या लेखनविषयक व भाषाविषयक विचारांचा अनेक ठिकानी निर्देश केला आहे तेव्हा त्यांची ह्यासंबंधीची भूमिका समजावून घेणे गरजेचे आहे.समर्थांनी हयातभर अखंड लेखनाचा उद्योग केला. दिसामाजी काही तरी लिहावे, वाचावे असा त्यांचा दंडक होता.अक्षर कसे आसावे-नसावे ह्याबाबत त्यांनी दासबोधात( लेखनक्रियानिरूपण ) काळजीपूर्वक सांगितले आहे.तसेच दासबोधात अन्य विषय कथन करताना लेखन हेतूही स्पष्ट केले आहेत.ग्रंथारंभलक्षण, कवेश्वरस्तवन मधून ते आपली ग्रंथ व कवी संबंधीची भूमिका मांडतात.कवी कसा असावा, कसा नसावा, कविता कशी असावी कशी नसावी ह्यासंबंधी ‘कवित्वकलानिरूपण’ मध्ये विवेचन केले आहे. हा ग्रंथ रामदासांचे आत्मचरित्र ठरावा असा आहे. त्यांची करूणाष्टकांची रचना तर अत्यंत आत्मनिष्ठ आहे. यावरून त्यांची लेखनविषयक भूमिका लक्षात येते.

रामदासांचा दासबोध म्हणजे गुरू-शिष्य संवाद असल्यामुळे स्वाभाविकच त्यातून त्यांच्या वक्तृत्व शैलीचा अंदाज येतो. ते जनसमूहाशी, शिष्यपरिवाराशी कसे बोलत चालत असतील ह्याचे हावभाव सहित चित्र डोळ्यासमोर उभे राहते. तर सावरकरांचे किती तरी लेखन हे त्यांच्या सभा-संमेलनातील भाषणांचे मुद्रण आहे. त्यामुळे त्यातून त्यांच्या वक्तृत्वाचा व हावभावयुक्त विषय प्रतिपादनाचा अंदाज येतो. दोघांच्या लेखनाच्या ह्या समान वैशिष्ट्यमुळे आपल्या समोर ते बोलत आहेत असे वाटते. त्यायोगे त्यांच्या प्रभावशाली, ओजस्वी, शब्दचमत्कृतीपूर्ण सहजस्फूर्त प्रतिभेचे दर्शन घडते.

समकालिन संतापेक्षा रामदासांची लेखनी समाजजीवन चित्रणात अधिक रमते. समर्थांना मराठी भाषेविषयी नितांत आभिमान होता. त्यांनी जाणिवपूर्वक देशीभाषेचा व बोलीचा अंगीकार केल्याचे दिसते. त्यातूनच त्यांची वेगळी अशी ओबडधोबड धाटणीची भाषाशैली बनली आहे. महाराष्ट्धर्म वाढवावा असे म्हणतानाच महाराष्ट्री भाषेचा ते पुरस्कार

करतात. त्यांनी विपूल प्रमाणात काव्यरचना केली असली तरी त्यांची शैली काव्यात्मतेपेक्षा गद्यात्मतेला जवळची वाटते. त्यांच्या लेखनात संस्कृतप्रचुर शब्दांचा भरणाही भरपूर आढळतो. रामदासांची 'करूणाष्टके' 'मनाचे श्लोक' आणि 'रामायण' ही प्रकरणे श्लोकबद्ध आहेत आणि ही सर्व श्लोक रचना त्यांनी 'भुजंगप्रयात' वृत्तात केली आहे.करूणाष्टकातील केवळ पाच रचना मालिनी वृत्तातील आहेत. यावरून रामदासांना भुजंगप्रयात वृत्तात काव्य रचने विशेष भावत असावे असे वाटते.अन् सावरकरांनी तर त्यांच्या वृत्तीला भावणारे निर्यमक असे 'वैनायक' वृत्त घडवले होते व त्यातच त्यांनी जाणीवपूर्वक रचना केली.सावरकरांनी गद्य-पद्यात्मक अशी विपुल रचना केली आहे. सावरकरांच्या गद्यात व नाटकात पदोपदी काव्यात्म अनुभवांचा प्रत्यय येतो इतकी त्यांची शैली उत्कट काव्यमय आहे. त्यांची काव्यरचना ही आत्मनिष्ठ स्वरूपाचीआढळते. एकूणच सावरकरांची शैली समकालीन लेखक कवी पेक्षा वेगळ्या धाटणीची झाली आहे.मराठी भाषाशुद्धीसाठी त्यांनी स्वतंत्र चळवळ उभी केली, त्यासाठी त्यांनी आपल्या लेखनात जाणीवपूर्वक इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द वापरले. हिंदी ही राष्ट्रभाषा झाली पाहिजे असे म्हणणारे सावरकर मराठीचे कट्टर अभिमानी होते. त्यांनी 'अ' च्या बाराखडीत लेखन करावे वगैरे देवनागरी लिपीसुधारणे बाबत सूचना मांडल्या आहेत. तसेच त्यांच्या लेखनात संस्कृत सुभाषिते व अवतरणांची जागोजाग पखरण केलेली आढळते. त्यांचा गगणभेदी उत्तुंग कल्पनाविलास पाहता महाकवी योग्यतेच्या त्यांच्या प्रतिभेचा प्रत्यय येतो. आपल्या ओजस्वी लेखनातून त्यांनी प्रामुख्याने वीर रसाची आळवणी केल्याचे दिसते.सावरकरांचे बरेचसे साहित्य प्रचारकी थाटाचे आढळते.

डॉ.सौ.उषा जोशी म्हणतात की, ''समर्थांनी जाणीवपूर्वक विविध रचनाप्रकार आकृतीबंध ा वापरले कारण त्यांना समाजाच्या सर्व थरातील व्यक्तींना विशिष्ट ध्येयानुरूप कार्याला उद्युक्त करावयाचे होते.त्यासाठी त्यांच्याशी जवळीक साधने,एकरूप होणे आवश्यक होते. ते या विविध रचनाप्रकारांच्या द्वारे उत्तम त-हेने साध्य झाले.समर्थांचे जीवन घडविणा-या व त्यांच्या काव्याला रंगरूप देणा-या प्रेरणा समान होत्या हे यावरूनही प्रत्ययास येते.''(समर्थ साहित्यातील आकृतीबंध-डॉ.उषा जोशी, पृष्टः २५२ ) तर सावरकरांच्या समग्र लेखनाचा विचार करता सावरकरांच्याही जीवनविषयक प्रेरणा व साहित्यविषयक प्रेरणा ह्या समानच असल्याचे दिसते; आणि येथे विशेष म्हणजे रामदास आणि सावरकरांच्या ज्या काही 'प्रेरणा' होत्या त्या बहूतांश प्रेरणा दोघांच्याही साहित्यनिर्मितीला प्रेरित करण्यास कारणीभूत झाल्या आहेत.ह्या दृष्टीने ही अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करावयाचे ठरविले आहे.

## सामाजिक प्रबोधनाविषयी विचार

समर्थांचा वा सावरकरांचा मूळ पिंड समाजसुधारकाचाच होता तेव्हा त्यांच्या सामाजिक कार्याचे व भूमिकांचे येथे विश्लेषण करणे गरजेचे आहे.दोघेही प्रयत्नवादाचे पुरस्कर्ते असून त्यांनी नेहमी आशावादी दृष्टिकोनाातून लेखन केले आहे.साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते

याचा खरा प्रत्यय ह्या दोघांचे साहित्य वाचून येतो. त्यांच्या लेखनावर तत्कालीन सामाजिक व राजकीय घडामोडींचे पडसाद उमटलेले दिसतात.

रामदास हे संतकवी असले तरी ते वृत्तीने विचारवंत आहेत तर सावरकर हे विचारवंत होते पण आपले समाजसुधारणेचे विचार जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी लेखणी हाती घेतली. विज्ञाननिष्ठ, शास्त्रशुद्ध विचाराने भारलेला समाज घडविण्यावर सावरकरांचा भर होता. शस्त्र अन् शास्त्राचे पुरस्कर्ते असे त्यांना संबोधतात. तसे रामदास हे ही प्रपंचविज्ञानाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी अध्यात्म विचाराबरोबरच संसाराचे व समाजजीवनाचे विस्तृत चिंतन केले आहे.रामदास एखाद्या साक्षेपी राजकीय निरीक्षकाप्रमाणे तीर्थयात्रेत तत्कालीन यावनी सत्तेने समाजावर केलेल्या पाशवी आत्याचारांची आणि त्यामुळे समाजाच्या झालेल्या करूण अवस्थांची शब्दचित्रे आपल्या प्रवाही,गतिमान अशा स्फुट काव्यातून रेखाटत राहतात अशा वेळी जुलमी यावनी राज्यकर्त्या संबंधीचा तीव्र संताप आणि पीडित व शोषित समाजाविषयी अपार करूणा,तशीच दाहक वेदना रामदासांच्या शब्दाशब्दातून ओसंडत राहते; परिणामी रामदासांचे अध्यात्मकारण समाजकारणाभिमुख, समाजकारण राजकारणाभिमुख आणि राजकारण स्वराज्याभिमुख होते.

अंधश्रद्धा, भोंदूगिरी सोंगा-ढोंगाची लुच्चेगीरी ह्यांचा त्यांना तिटकारा होता. त्याकाळी शुद्र दैवतांचा बुजबुजाट वाढला होता त्यावर रामदासांनी कडाडून हल्ला केला. त्यांनी चातुर्वर्ण्य व्यवस्थेचेही विवेचन केले आहे.ते सामाजिक चालीरीतीच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या चौकटीत राहू इच्छितात.त्यांनी ब्राम्हणांस श्रेष्ठत्व बहाल केले आहे.त्यांना महंत अथवा गुरू ब्राम्हण हवा आहे. तर सावरकरांना मात्र पिढीजात जातीपातीच्या शृंखला तोडायच्या आहेत. रोटीबंदी, सिंधुबंदी, व्यवसाय बंदी,वेदोक्तबंदी इत्यादी सात बेड्या तोडायच्या आहेत. ते म्हणतात-'खरे म्हणजे जो धर्म कर्म करतो तो भिक्षुक ही जर खरी व्याख्या असेल तर अस्पृश्यातील जे कोणी यथासांग धर्म कर्म करत असतील त्यांनाही आपण कार्यास बोलावले पाहिजे.त्यामुळे वेदांचे अनुयायी वाढतील ते एक पाउल पुढे पडेल.माझ्या मुलाच्या लग्नाच्यावेळी जो कोणाी योग्य प्रकारे विधिपूर्वक पौरोहित्य करील असा महार किंवा चांभार मिळाला तर मला अधिक आनंद होईल.

सावरकर हे कठोर वास्तववादी विचारवंत आहेत. समाजसुधारणेचा विज्ञाननिष्ठच मार्ग त्यांना पसंत होता. तत्कालीन जुलमी इंग्रजी राजवटी चे वर्णन त्यांच्या लेखनात आढळते. अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून सावरकरांनी सहभोजनाची, सहगमनाची चळवळ सुरू केली. रत्नागिरीस पतितपावन मंदिराची उभारणी केली. तेथेच पतितपावन उपहारगृह सुरू केले. अंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला. शुद्धी चळवळ पुरस्कारली. ह्याच्या प्रतिपादनासाठी त्यांनी देशातल्याच इतिहासाचे दाखले दिले आहेत. भारतीय समाजासमोर त्यांनी पाश्चात्यांच्या चांगल्या निवडक वर्तनाचा आदर्श उभा केला.

रामदासांना श्रीराम हा सर्वोसर्वा वाटतो तर सावरकरांना पतितपावन तोच ईश्वर वाटतो. ‘‘कोणतेही नाम दुजे प्रिय न मज गमे। अधिक या युगात पतितपावनाहुनी । पतितपावन हेचि ब्रीद या युगी । अशी काव्यपंक्ती त्यांनी उःशाप नाटकात श्रीकृष्णाच्या मुखी घातली आहे.

समर्थ आणि सावरकर दोघांनीही आपली लेखणी सामाजिक प्रबोधनासाठी खर्ची केली. हे दोन्ही प्रतिभावंत पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणारे होते. समाजकारण, राजकारण व धर्मकारण ह्या परस्परांचा कसा संबंध असतो हे प्रस्तुत दोघांच्या तुलनात्मक अभ्यासावरून लक्षात येणार आहे.

## समकालीन राजकारण व स्वराज्यासंबंधी विचार

समर्थांनी व सावरकरांनी समकालीन राजकारणात भाग घेतला व कालानुषंगाने समाज स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले त्यांचा ह्यासंबंधीचा विचार अभ्यासक येथे मांडू इच्छितो.

समर्थांनी बालवयातच मातेसमोर अंतर्मन प्रकट केले होते की-‘चिंता करीतो विश्वाची’. आणि पुढे त्यांची भूमिकाही अशीच राहिली की, जे जे आपणाशी ठावे ते ते इतरांशी सांगावे. ते समाजकारणात अखंड सकीय राहिले. त्यांनी छत्रपती शिवाजी राजांना आणि छत्रपती संभाजी राजांना पत्रे लिहून आपली राजकारण कौशल्याची चुणूक दाखवली आहे.शिवाय दासबोधात अकराव्या व एकोणिसाव्या दशकात ‘राजकारण निरूपण’ नावाचे दोन स्वतंत्र समास लिहिले आहेत.त्याच बरोबर चातुर्यविवरण, चातुर्यनिरूपण, महंत लक्षण अशा समासातही राजकारण विचाराची चर्चा केली आहे.

संत रामदासांचे खरे कर्तृत्व महाराष्ट्रातील सजग मनांची अध्यात्मिक पातळीवर राजकारणसन्मुखतेने संघटना बांधण्यात आणि स्वराज्य स्थापनेच्या कार्यात लोकांना कृतिप्रवण करण्यात प्रकट झाले आहे.शिवाजी महाराजांच्या स्वराज्यनिर्मितीच्या साक्षेपी प्रयत्नास धार्मिक, नैतिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान त्यांनी मिळवून दिले.

सावरकरांनीही बालपणीच शपथ घेतली होती की- ‘भारतमातेच्या मुक्तीसाठी मी मारिता मारिता मरेतो मरेन’ आणि स्वराज्याचा केतू उभारण्यासाठी ते अखंड लढत राहिले. स्वातंत्र्य संपादन, संवर्धन नि संरक्षण ह्या एकमेव विचाराने त्यांच्या जीवनाचा आदि-मध य-अंत व्यापलेला होता.

समर्थांनी आणि सावरकरांनीही स्वराज्यासाठी शस्त्रपूजा प्रमाण मानली आहे. अहिंसेची टवाळी केली आहे.राजकारण निरूपण करण्यापूर्वी समर्थांनी आणि राजकारणात भाग घेण्यापूर्वी सावरकरांनी भारत भ्रमण केले,संपूर्ण देशस्थिती पाहिली आणि मग महाराष्ट्रात स्थिर होउन राजकारण केले.

समर्थांनी ज्या मार्गावरून आपली वाटचाल केली तोच पूर्वसूरींचा आदर्श सावरकरांनी उचललेला दिसतो. ''आम्ही तरूण विद्यार्थ्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी काय करावे ?'' असे विचारता सावरकर म्हणतात , ''प्रथम आपण कोण व्हायचे ते निश्चित करा. भगतसिंगाप्रमाणे हुतात्मा व्हायचे की संपादक व्हायचे ? शंभर संपादक किंवा व्याख्याने किंवा कॉंग्रेसची दहा अधिवेशने यांनी जी राजकीय जागृती होत नाही ती भगतसिंग, राजगुरूच्या हौतात्म्याने होते. आणि मला विचाराल तर बाबू गेणूच्या मोटारीखाली स्वतःचे प्राण देण्याच्या बलिदानापेक्षा भगतसिंगाचे आक्रमक हौतात्म्यच राष्ट्राला उपकारक असते.मारिता मारिता मरावे हा समर्थ रामदासांचा मंत्र महाराष्ट्राने विसरू नये.'' (हिंदुसमाज संरक्षक स्वा.सावरकर(रत्नागिरी पर्व) --बाळाराव सावरकर पृष्ट क्रः२५६)

समर्थ हे छ.शिवरायांच्या स्वराज्य उभारणीत प्रत्यक्ष साक्षी होते.त्यांनी तत्कालीन राजकारणात अप्रत्यक्ष भाग घेतला तर सावरकरांनी मात्र राजकारणात प्रत्यक्ष हिरीरिने सहभाग घेतल्याचे दिसते.दोघेही उत्तम पुरःसर होते व संघटक होते हे निश्चित. समर्थांप्रमाणेच सावरकरांची निष्ठा ही छ.शिवराय आणि मराठ्यांच्या इतिहासाप्रतीच दिसते. हा इतिहास सतराव्या शतकात समर्थांनी प्रत्यक्ष जागवण्याचे काम केले तर एकोणिसाव्या शतकात ह्याच इतिहासाधारे सावरकरांनी जनतेला स्वातंत्र्यासाठी प्रेरित केल्याचे दिसते.सावरकर म्हणतात की, ''आपणा सर्व महाराष्ट्रीयांचे राष्ट्रीय मूळपुरूष कुलपती छत्रपती शिवाजी महाराज हेच आहेत. त्यांनीच महाराष्ट्राला 'महाराष्ट्र' म्हणून जन्म दिला. पहिला स्वराज्य संस्थापक हिंदुपदपातशहा तो ! पहिला क्रांतिपुरूष तो ! ''( सावरकर विचारदर्शन - डॉ.गोडबोले पृष्ट क्रः ८२)

राजकारणाचा विषय हाताळणारा एकही संत आपणास सापडत नाही.तो अपवाद समर्थांचा आहे तर सावरकरकालीन कोणताही लेखक-कवी राष्ट्रवादाच्या विचाराने झपाटून समकालीन राजकारणात भाग घेताना दिसत नाही.ह्याला अपवाद सावरकरांचा....! सावरकरांना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी शस्त्रपूजा प्रिय होती तर समर्थांनी स्वराज्य निर्मितीसाठी शस्त्रधारी श्रीरामाचीच निवड केली होती. सावरकरांनी 'बालमेळा' स्थापन करून इंग्रज सरकारविरूद्ध कारवाया केल्या. व्यायामशाळा स्थापन करून बलोपासनेसाठी प्रेरित केले. समर्थांनी हनुमान मंदिरे स्थापून बलोपासना केली व संघटीत शिष्य परिवार वाढवला.संघटनेने,शक्तीने मिळते राज्य या गोष्टीवर दोघांचाही विश्वास होता.रामदासांची व सावरकरांची गनिमी काव्यावर भिस्त दिसते. ते उदात्त, नीतियुक्त राजकारणाचे पुरस्कर्ते होते.प्रस्तुत प्रकरणात या दोन व्यक्तित्वोच्या राजकरण व स्वराज्यासंबंधीच्या विचारांचा शोध घेता येईल.

## धर्म संकल्पना व हिंदूधर्म संस्थापनेसंबंधी विचार

समर्थांच्या आणि सावरकरांच्या विचारधारेतला महत्त्वाचा विचार हिंदूधर्म संस्थपनेसंबंधीची त्यांची भूमिका हा होय.ह्यासंबंधीचा निरक्षीर विचार येथे अपेक्षित आहे.

'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' असे संबोधून रामदास धर्मस्थापना

करू इच्छितात. यासाठी त्यांनी प्रभू रामचंद्राला व तुळजाभवानी या दैवतांना साकडे घातले आहे. समर्थांच्या लेखनाची उद्दिष्टेच मुळी नीती स्थापना, धर्म स्थापना, राज्य स्थापना ही सांगितली जातात.

सावरकरांनाही हिंदुत्वाचा एक व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. त्यांच्या मते 'हिंदुत्व' व 'हिंदुधर्म' ह्या दोन भिन्न संकल्पना आहेत. हिंदुत्व हे मूलभूत , सर्वव्यापी तत्व असून हिंदुध र्म त्याचे एक उपांग आहे. ब्रिटिशांच्या जुलमी जोखडातून स्वातंत्र्य देवतेची मुक्तता करण्यासाठी त्यांनी हिंदुत्ववादी राष्ट्र उभारणीचे कार्य केले. त्यांनी हिंदू महासभेच्या माध यमातून हिंदुत्ववादी विचाराची चळवळ चालवली.

हिंदूधर्म विचाराची आणि म्लेंच्छांच्या अनर्थाची वारंवार पुनरूक्ती समर्थांच्या व सावरकरांच्या लेखनात दिसून येते. एकाच एका  हिंदुत्ववादाचा ह्या दोघांनी पुरस्कार केल्यामुळे त्यांच्या विचारांना काहीशा मर्यादाही पडलेल्या दिसतात.दोघांच्याही हिंदुत्वाचा बिजभूत अर्थ समान आहे.शंकराचार्य डॉ.कूर्तकोटी म्हणतात की, ''रामदासांनी ज्याला महाराष्ट्र धर्म असे नाव दिले ज्याची लोकमान्यांनी 'प्रामाण्य बुद्धिर्वेदेषु'अशी व्याख्या केली, आणि सावरकरांनी हिंदुत्व ह्या पुस्तकात हिंदुस्थानास पितृभूमी नि पुण्यभूमी समजणारांचा जो धर्म तोच हिंदुधर्म असे म्हटले आहे.तिघांचा मूळ अर्थ एकच ! ह्यात सावरकरांची व्याख्या विस्तृत आहे नि तीच आज सर्वमान्याता पावली आहे.''

सावरकरांची हिंदुत्वाची संकल्पना अतिव्याप्ती व अव्याप्ती ह्या दोनही प्रकारच्या दोषापासून मुक्त आहे. ह्या व्याख्या प्रमाणे वैदिक धर्मानुयायी, शीख व भारतीय बौद्ध, जैन, लिंगायत, नास्तिक, ब्राम्होसमाजी, गिरीजन, वनवासी इत्यादींचा समावेश 'हिंदू' मध्ये होतो. रामदासांना अभिप्रेत महाराष्ट्र धर्म सावरकरांइतका व्यापक नसावा असे त्यांच्या लेखनावरून वाटते.त्याला काही मर्यादा दिसतात. रामदासांचा हिंदुधर्म विचार सावरकारांइतका कट्टर ,आग्रही व सुस्पष्टही नसल्याचे दिसते.

समर्थांची हिंदुत्वाचा पुरस्कार करणारी रामदासी संप्रदायाची चळवळ पुढे फारसी वाढली नाही. रामदासी परंपरेचे  अल्पसेच लेखक झाले,पण पंथ म्हणावा तसा फोफावला नाही.असे असले तरी एकोनिसाव्या शतकातील सावरकरांसारखे विचारवंत हे समर्थांच्याच विचारधारेचे अधुनिक रूप म्हटले पाहिजेत. समर्थांच्या प्रत्येक  राष्ट्रसंबंधी विचाराला श्रीराम आणि हिंदुत्व ह्या दोन बाजू आहेत. तर सावरकरांच्या प्रत्येक राष्ट्रसंबंधी विचाराला विज्ञाननिष्ठा आणि हिंदुत्व ह्या दोन बाजू आहेत. समर्थांचे श्रीराम प्रेम हे सावरकरांच्या राष्ट्रप्रेमागत अद्वितीय आहे. अर्थात सावरकरांचे राष्ट्रप्रेम हे समर्थांच्या श्रीरामभक्ती इतकेच अनन्यसाधारण आहे असे म्हणता येईल.सावरकर  स्वातंत्र्यदेवीच्या स्तोत्रात म्हणतात की,

मोक्ष मुक्ती ही तुझीच रूपे तुलाच वेदांती ।

स्वतंत्रते भगवते योगिजन परब्रम्ह वदती ।।

बाकी दोघांच्या विचारातली हिंदुत्वाची व धर्मसंस्थापने संबंधीची बीजभावना समसमान असल्याचे दिसते.

अशा प्रकारचा तुलनात्मक विचार या प्रस्तुत प्रबंधाच्या निमित्ताने प्रथमच येत आहे.अशा प्रकारच्या अभ्यासातून मराठी साहित्यातील वेगळ्या काळातील समान जाणिवांच्या लेखकांच्या लेखनामागील प्रेरणा,भूमिका आणि व्यक्तिमत्त्वावर प्रथमच प्रकाश पडत आहे. तुलनात्मक दृष्टीने होणा-या या अभ्यासाचा हा नवा प्रयत्न आहे.

## निष्कर्ष

१.भिन्न भाषिक, भिन्न प्रादेशिक लेखकांचा तुलनात्मक विचार होउ शकतो तसा एकाच भाषेतील, वेगवेगळया परंपरेतील भिन्नकालीन प्रतिभावंताचा तुलनात्मक अभ्यास औचित्यपूर्ण ठरतो.

२.रामदासांनी प्रत्यक्ष संसार पासून पलायण केले,परंतु त्यांनी संसार आणि परमार्थ ह्या दोन्हीचा पुरस्कार केला आहे. तर सावरकरांनी संसार स्वीकारला पण त्यांना तो नेटका करणे जमले नाही.देशाच्या संसाराकडे त्यांचे लक्ष लागले होते.

३.रामदासांनी प्रामुख्याने ‘वीर’ अन् ‘करूण’ ह्या दोन्ही रसांचा समसमान परिपोष केला आहे. तर सावरकरांच्या लेखनात तेजस्विता आढळते.प्रामुख्याने त्यांनी वीर रसाचा पुरस्कार केला असला तरी प्रसंगी ते करूण रसाचाही अंगीकार करतात.

४.रामदासांनी समकालीन शैलीप्रमाणे अभंग, ओवी, श्लोक, आरती, स्तोत्रे इत्यादी लेखनप्रकार हाताळले आहेत. तर समकालीन परंपरेप्रमाणे सावरकरांनी काव्य, कादंबरी, नाटक,चरित्र, आत्मचरित्र, निबंध,इतिहास आदी वाङ्‌मय प्रकार हाताळले आहेत.

५.समर्थांचे व सावरकरांचे विचार बुद्धिवादी आणि पुरोगामी आहेत. अननुभवनिष्ठेतून त्यांनी विचार प्रतिपादन केले आहेत. तत्कालीन समाजाला दोघांचेही विचार सहजासहजी पचनी पडले नाहीत. ते झोंबणारे जहाल विचार समाजाला बंडखोर वाटले.

६.रामदासांनी अपेक्षीलेले मुस्लिम राजवटीच्या जुलमातून मुक्त असे ‘रामराज्य’ आणि सावरकरांनी अपेक्षिलेले ब्रिटीश आत्याचारातून मुक्त असे स्वकीयांचे ‘स्वराज्य’ एकच होते. ते साध्य करण्यासाठी दोघांनीही बालपणीच्या शपथाप्रमाणे अखेरपर्यंत कार्य केले.

७.हिंदुत्व म्हणजे फक्त विशिष्ट जाती-जमातीचेच लोकराज्य अशी संकल्पना दोघांनाही अपेक्षीत नव्हती. तर हिंदुस्थानातील अधिवास व मातृभूमीच्या एकनिष्ठ प्रेमाशी ती निगडीत होती.अधिक व्यापक होती.

## -: संदर्भ ग्रंथ यादी :-


१) तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन वाङ्‌मय र.बा.मंचरकर

२) तौलनिक साहित्याभ्यास-तत्त्वे आणि दिशा -- चंद्रशेखर जहागीरदार

३) तौलनिक साहित्य (भारतीय संदर्भ) -- वसंत बापट

४) रामदास : वाङ्‌मय आणि कार्य --न. र. फाटक

५) रामदास (व्यक्तिदर्शन) --श. श्री. पुराणिक

६) श्रीसमर्थ चरित्र --स. ख. आळतेकर

७) श्री मनाचे श्लोक-भाष्य,सार आणि संगती --शि.न.भावे

८) प्राचीन मराठी वाङ्‌याचा इतिहासःभाग पाचवा --अ.ना.देशपांडे

९) प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास --डॉ.पिंपळवाडकर,प्रा.वाडीकर

१०) रामदासांचे प्रपंचविज्ञान -- श्री.म. माटे

११) समर्थ रामदास विवेकदर्शन --संपा.वि.रा.करंदिकर

१२) श्रीसमर्थ आणि समर्थ संप्रदाय -- सेतु माधवराव पगडी

१३) समर्थ रामदास --य.दि. पेंढारकर

१४) संत वाङ्‌याची सामाजिक फलश्रुती --गं.बा.सरदार

१५) ऐतिहासिक प्रस्तावना --वि.का. राजवाडे

१६) संतांच्या आत्मकथा --रा.चि. ढेरे

१७) श्रीसमर्थ चरित्र --शं.श्री. देव

१८) श्रीसमर्थ ग्रंथ भांडार --ल.रा. पांगारकर

१९) स्वा.सावरकर आत्मचरित्रःपूर्वपिठीका --वि.दा.सावरकर

२०) हिंदुत्व --वि.दा.सावरकर

२१) समग्र सावरकर वाङ्‌मय : खंड १ ते ८ -- संपा. श.रा.दाते

२२) स्वा.सावरकर --वि.स.वाळिंबे

२३) वीर सावरकर --धनंजय कीर

२४) स्वा.सावरकरांचा चिकित्सक अभ्यास --डॉ.गावडे

२५) आधुनिक मराठी वाङ्‌मयाचा इतिहास --अ.न.देशपांडे

२६) सावरकरांचे सामाजिक विचार --संपा.विद्याधर पुंडलिक

२७) भाषाशुद्धी --वि.दा. सावरकर